**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**

# इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटच्या बॉलिवूड नाईट फूड फेस्टिव्हलला प्रतिसाद

## इंडियन व कॉंटिनेंटल पदार्थांची रेलचेल

▲ **पाटण**, दि. १५ : येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, पाटणच्यावतीने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी बॉलिवूड नाईट या थीमवर फूड फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले होते. या फेस्टिव्हलमध्ये इंडियन, कॉंटिनेंटल अशा पदार्थांची रेलचेल पहावयास मिळाली. या फेस्टिव्हलला पाटणसह परिसरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या फेस्टिव्हलचे उद्घाटन कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर, संचालक श्रीमंत याज्ञसेन पाटणकर, संचालक संजीव चव्हाण, डॉ. प्रल्हाद चव्हाण, डॉ. बी. एन. पाटील, डॉ. खोत यांच्या हस्ते करण्यात आले.

या फेस्टिव्हलचे आयोजन पाटण नगरवासीयांसाठी अतिशय नवखे होते. त्यामुळे प्रत्येक अतिथींमध्ये वेगळे कुतूहल पहावयास मिळाले. बॉलिवूड थीम असल्याने परिसरातील संपूर्ण वातावरण या थीमशी मिळतेजुळते करण्यात आले होते. वेलकम ड्रिंक म्हणून लेमन मिंट कूलर, लाईव्ह स्वीट कॉर्न चाट, रेड सॉस पास्ता, हॉट न सोर सूप, फिशकरी, चिकन लाल मांस, मटण मसाला, दाल मखनी, पनीर दो प्याझा, बिर्याणी राईस, दुधी हलवा अशा चविष्ट पदार्थांची मेजवानी पाटण नगरवासीयांसाठी केली होती.



फूड फेस्टिव्हलच्या उद्घाटनप्रसंगी अमरसिंह पाटणकर, याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, डॉ. प्रल्हाद चव्हाण, डॉ. बी. एन. पाटील, डॉ. खोत व इतर.

या मेनूची नावे देखील थीमला साजेशी ठेवण्यात आली होती, जसे की मोगॅम्बो कूलर, दबंग देसी कॉर्न, कुछ कुछ होता है सूप, मटण ना मिलेगा दोबारा, गुमनाम रोटी बास्केट, तेरे नाम राईस, दिलवाली रबडी, दाल तो पागल है, पनीर हेराफेरी, गोलमाल पास्ता इत्यादी. आलेल्या पाहुण्यांना मनोरंजनासाठी बॉलिवूड गाणी, डान्स, मुलांसाठी आणि तरुणाईसाठी सेल्फी पॉइंट असे काही आयोजित करण्यात आले होते. संपूर्ण फूड फेस्टिव्हलचे आयोजन हॉटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली केले.

पाटण शहरातील नामवंत व्यावसायिकांनी या उपक्रमास आपला प्रतिसाद विद्यार्थ्यांना स्पॉन्सरशिप स्वरूपात दर्शविला. आदिती आरंभ, फास्टट्रॅक एजुकेशन, अमर साबळे असोसिएट, रत्नश्री कलेक्शन, अंबिका ज्वेलर्स, आपला बाजार, श्रीराम नागरी पतसंस्था, फिश, सुस्वाद हॉटेल, दरबार बिर्याणी, मॉन्जिनीज आणि अशा बऱ्याच व्यावसायिकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. पाटणवासीयांसाठी हा नवीन अनुभव असल्याने त्यांनी देखील विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले.

माजी मंत्री श्रीमंत विक्रमसिंह पाटणकर, युवा नेते श्रीमंत सत्यजितसिंह पाटणकर यांनी देखील विद्यार्थ्यांच्या या उपक्रमास भरभरून शुभेच्छा दिल्या. कॉलेजचे प्राचार्य चेतन सावंत, प्रा. अमोल चव्हाण, प्रा. समीर सपकाळ, प्रा. भरत कांबळे तसेच इतर शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. कोयना एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटमध्ये विद्यार्थ्यांना संपूर्ण हॉटेल व्यवस्थापन कसे असते याचा अभ्यास घेतला जातो. विद्यार्थ्यांना कूकिंग, बेकिंग, सर्व्हिस, रूमचे व्यवस्थापन, गेस्टचे आदरातिथ्य या गोष्टी शिकवल्या जातात व हे शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना विविध उपक्रमास सामोरे जावे लागते, त्यापैकी एक म्हणजे फूड फेस्टिव्हल. फेस्टिव्हल करण्यामागचा हेतू म्हणजे विद्यार्थ्यांचे कलागुण, त्यांचे मार्केटिंग कौशल्य, त्यांना भेटणारा कूकिंगचा, सर्व्हिसचा अनुभव जो त्यांना पुढे करियर घडवताना अतिशय मौल्यवान ठरत असतो.